नवराष्ट्र
www.navarashtra.com

## विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडवणारे संस्कारपीठ - रोहित देशपांडे

# मुकुलचा १५ वा वर्धापन दिन

रत्नागिरी, (वा.) मुकुल माधव विद्यालय हे केवळ ज्ञानाचे केंद्र नसून, विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडवणारे संस्कारपीठ आहे. या यशामध्ये आमचे शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि संस्थेचे मोलाचे योगदान असल्याचे प्रतिपादन मुकुल माधव विद्यालयाचे मुख्याध्यापक रोहित देशपांडे यांनी केले. फिनोलेक्स इंडस्ट्रीज लि. यांच्याद्वारे दान केलेल्या १० एकर जागेवर मुकुल माधव फाउंडेशनच्या पुढाकाराने स्थापन झालेले मुकुल माधव विद्यालय यावर्षी आपला १५ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करत आहे. यावेळी आयोजित कार्यक्रमात देशपांडे बोलत होते.



### विविध उपक्रमांसह सलग १००% निकाल

१०वी व १२वीच्या बोर्ड परीक्षांमध्ये सलग १००% निकाल. सिल्व्हर झोन फाउंडेशन, नवी दिल्लीकडून शैक्षणिक उत्कृष्टता पुरस्कार. जेट टॉय व स्किमर ऑलिंपिक, खुला आसमाँ कला स्पर्धा, रंगबहार स्पर्धा, देश आपनायें उपक्रम.

### पायाभूत सुविधांमध्ये शाळेची उल्लेखनीय प्रगती

केवळ १५० विद्यार्थ्यांपासून सुरू झालेला प्रवास आज ५०० हून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला आहे. शाळेच्या स्थापनेपासून आजपर्यंत शिक्षण, कला, पर्यावरण, सामाजिक जबाबदारी आणि आधुनिक पायाभूत सुविधांमध्ये शाळेने उल्लेखनीय प्रगती केली आहे.शाळेमध्ये सौरऊर्जा प्रकल्प, पावसाच्या पाण्याचे संकलन (रेन वॉटर हार्वेस्टिंग), वीज प्रतिबंधक यंत्रणा (लाइटनिंग अरेस्टर), आणि स्वतःचा भाजीपाला तुकडा (व्हेजिटेबल पॅच) अशा सुविधा उपलब्ध आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक शिक्षणाची अनुभूती मिळते, असेही ते पुढे म्हणाले.

### सर्व विद्यार्थिनी ऐश्वर्याचा जर्मनीतील शिबिरात सहभाग

विद्यार्थ्यांना योगा, कराटे, ॲरोबिक्स, बुद्धिबळ आणि जर्मन भाषा यांचे प्रशिक्षण अतिरिक्त शुल्क न आकारता दिले जाते. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणि कौशल्ये विकसित होत आहेत. विशेष अभिमानाची बाब म्हणजे, आमच्या विद्यार्थिनी ऐश्वर्या केळकर हिने गोएथे इन्स्टिट्यूट, पुणे यांच्याकडून शिष्यवृत्ती मिळवून जर्मनीतील भाषा शिबिरात सहभाग घेतला. ही आमच्यासाठी आंतरराष्ट्रीय गौरवाची बाब असल्याचेही श्री देशपांडे यांनी यावेळी स्पष्ट केले. या सर्व यशामागे मॅनेजिंग ट्रस्टी रितू प्रकाश छाब्रिया यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व व प्रेरणादायी मार्गदर्शन आहे. त्यांच्या सततच्या प्रोत्साहनामुळेच मुकुल माधव विद्यालयाने यशाची शिखरे गाठली असल्याचे श्री देशपांडे यांनी सांगितले.

### आंतरराष्ट्रीय स्तरावरील मोठा सन्मान

२०२५ मध्ये भारतातील हिरव्या शाळांमध्ये ९ वा क्रमांक. ग्रीन स्कूल परिषद, न्यू यॉर्क येथे आमंत्रण – एक आंतरराष्ट्रीय स्तरावरील मोठा सन्मान. समाजसेवा व मूल्यशिक्षण हेच शाळेचे ब्रीद असून विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांतून सामाजिक जबाबदारीची जाणीव जोपासली आहे – जसे की समुद्रकिनारा स्वच्छता, निःशुल्क आरोग्य शिबिरे, ग्रंथ दान उपक्रम.